खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## अकरावी प्रवेश - मार्गदर्शन कार्यशाळा

लोकमत

### विद्यार्थ्यांनी आवडीनुसार करिअरची निवड करावी : शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : विद्यार्थ्यांनी दहावीला मिळालेल्या टक्क्यांवरून कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची निवड न करता आपली क्षमता, आवड विचारात घेऊन विद्याशाखेची निवड करावी आणि आपल्या करिअरचा राजमार्ग शोधावा, असे आवाहन करिअर मार्गदर्शक हेमचंद्र शिंदे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते. या प्रसंगी प्रसिद्ध वक्ते संजय कळमकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर आणि मोठ्या संख्येने प्रवेशच्छुक विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

हेमचंद्र शिंदे पुढे म्हणाले की व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा देताना अकरावी-बारावीचे प्रात्यक्षिक शिक्षण महत्त्वाचे असून, विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत. महागड्या शिकवणी वर्गात आपल्या पाल्याला प्रवेश दिला म्हणजे त्याचे करिअर होते हा समज चुकीचा असून, विद्यार्थ्यांनी जबाबदारीने अभ्यास केला तरच यश मिळेल, असे ते म्हणाले. संजय कळमकर यांनी मार्गदर्शन करताना महाविद्यालय हे शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवते असे सांगितले. भावना, संवेदना नसणाऱ्या आभासी जगात वावरणाऱ्या हल्लीच्या पिढीसमोर खूप आव्हाने असून, यशस्वी करिअरसाठी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहायला हवे. दहावीचा टप्पा आयुष्याला दिशा देणारा असून, योग्य वाटा शोधण्यासाठी सकारात्मक दृष्टी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

#### शिक्षक-पालकांनी एकत्र काम करावे

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संस्था कटिबद्ध असून, शिक्षणात होणारे काळानुरूप बदल स्वीकारत जेईई, नीट, सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी महाविद्यालयात अतिरिक्त शिकवणी वर्ग सुरू आहेत. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण सुरक्षित असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्था, शिक्षक व पालकांनी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Jun 08, 2024

दै. लोकमत



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना हेमचंद्र शिंदे.

## क्षमता, आवडीनुसार करिअर निवडावे : शिंदे

**राजगुरुनगर** : विद्यार्थ्यांनी आपली क्षमता, आवड विचारात घेऊन शिक्षण क्षेत्राची निवड करावी आणि आपल्या करिअरचा राजमार्ग शोधावा, असे आवाहन करिअर मार्गदर्शक हेमचंद्र शिंदे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवारी (दि. ५) आयोजित मार्गदर्शन मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध वक्ते संजय कळमकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. हेमचंद्र शिंदे म्हणाले, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा देताना अकरावी-बारावीचे प्रात्यक्षिक शिक्षण महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत. महागड्या शिकवणी वर्गात आपल्या पाल्याला प्रवेश दिला म्हणजे त्याचे करिअर होते, हा समज चुकीचा असून विद्यार्थ्यांनी जबाबदारीने अभ्यास केला तरच यश मिळेल, असे ते म्हणाले. संजय कळमकर, ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा साबळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. गीताराम टाकळकर यांनी केले, तर प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी आभार मानले.

दै. पुढारी

# विद्यार्थ्यांनी क्षमता व आवडीनुसार करिअर निवड करावी : हेमचंद्र शिंदे राजगुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** विद्यार्थ्यांनी दहावीला मिळालेल्या टक्क्यांवरून कला-वाणिज्य-विज्ञान शाखेची निवड न करता आपली क्षमता, आवड विचारात घेऊन विद्याशाखेची निवड करावी आणि आपल्या करिअरचा राजमार्ग शोधावा असे आवाहन करिअर मार्गदर्शक हेमचंद्र शिंदे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते.

या प्रसंगी प्रसिद्ध वक्ते संजय कळमकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर यांच्यासह प्रवेच्छुक विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

हेमचंद्र शिंदे पुढे म्हणाले की व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा देताना अकरावी-बारावीचे प्रात्यक्षिक शिक्षण महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत. महागड्या शिकवणी वर्गात आपल्या पाल्याला प्रवेश दिला म्हणजे त्याचे करियर होते हा समज चुकीचा असून विद्यार्थ्यांनी जबाबदारीने अभ्यास केला तरच यश मिळेल असे ते म्हणाले.

संजय कळमकर यांनी मार्गदर्शन करताना महाविद्यालय हे शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवते असे सांगितले. भावना, संवेदना नसणाऱ्या आभासी जगात वावरणाऱ्या हल्लीच्या पिढीसमोर खूप आव्हाने असून यशस्वी करिअरसाठी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहायला हवे. दहावीचा टप्पा आयुष्याला दिशा देणारा असून योग्य वाटा शोधण्यासाठी सकारात्मक दृष्टी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी संस्थेच्या वतीने उपस्थित विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संस्था कटिबद्ध असून शिक्षणात होणारे काळानुरूप बदल स्वीकारीत जेईई, नीट, सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी महाविद्यालयात अतिरिक्त शिकवणी वर्ग सुरू केल्याचे सांगितले. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण सुरक्षित असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संस्था, शिक्षक व पालकांनी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा साबळे यांनी प्रास्ताविक प्रा. गिताराम टाकळकर यांनी तर आभार प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी मानले.

**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांना विशेषतः गांव मौजे बारामती, ता. बारामती, जि. पुणे व बारामती तालुक्यातील व पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. विश्वनाथ कृष्णाजी भुजबळ, रा.बारामती, ता.बारामती, जि. पुणे यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांच्या मालकीची असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांस देवून सदर मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी विसारापोटी रक्कम स्विकारून विसार पावती करून देवून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, करार, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, विसार पावती, ताबा, खरेदी, लीज, लीन, पोटगी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी व लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे समजून तसेच असे कोणाचेही हक्क वा अधिकार असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन**

दै. राष्ट्रसंचार

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख